
2021-22

SHIVAJI COLLEGE HINGOLI

# स्वातंत्र्योत्तर भारतातील
# स्त्री-पुरुष समतामूलक समाज रचना

(स्थिती, गती आणि आम्ही)



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

संपादक

**डॉ. प्रतिभा टावरी**

**डॉ. संगीता भांगडिया (मालानी)**

310

| | | |
|---|---|---|
| 14 | स्त्री–पुरुष समानता और हिंदी साहित्य : प्रभाव एवं परिवर्तन — प्रा. छाया गुलाबराव जाधव | 102 |
| 15 | स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्री - पुरूष समातमुलक समाज रचना (स्थिती, गती आणि आम्ही ) — अनामिका पांडे | 106 |
| 16 | तृतीयपंथीयांचे मानवी हक्क : स्वरुप आणि वास्तविकता — डॉ. प्रतिभा ए. टावरी डॉ. संदीप बी. काळे | 110 |
| 17 | स्त्री – पुरुष समानता व भारतीय संविधान – तत्व व व्यवहार — प्रा.डॉ. अलका का. जाधव | 115 |
| 18 | भारतातातील स्त्री-पुरुष समानतेचे जागतिक स्तरावरील स्थान: एक तुलनात्मक अध्ययन — डॉ. मंगेश आचार्य | 121 |
| 19 | आधुनिक भारतातील स्त्री व शिक्षण — डॉ. मनिषा यादव | 129 |
| 20 | भारतीय समाज व स्त्री–पुरुष समानतेची वास्तविकता — प्रा. गोपालकृष्ण श्री. राखोंडे | 136 |
| 21 | स्त्री-पुरूष समानता आणि भारतीय संविधान : तत्त्व आणि व्यवहार — प्रा.डॉ.लक्ष्मण एफ. शिराळे | 143 |
| 22 | Gender Equality and Indian Family, Social Life: Condition and Direction — **Ku. Namrata S. Rajgure** | 151 |
| 23 | स्वातंत्र्योत्तर भारतातील स्त्री पुरुष समानता आणि भारतीय संविधान तत्व आणि व्यवहार — प्रा. डॉ. शुभांगी राठी | 158 |
| 24 | स्त्री पुरुष समानता : अर्थ स्वरूप महत्व : समज गैरसमज — डॉ दया पांडे | 169 |
| 25 | स्त्री पुरुष समानतेतून महिला विकास — डॉ. सौ. कविता एन. मालोकार ( कविता प्र. हिरूळकर ) | 178 |
| 26 | स्त्री-पुरुष समानता आणि भारतीय शिक्षण: आज व उद्या — डॉ. मनीषा बाळापुरे | 184 |
| 27 | महिलांना पुरुषाच्या बरोबरीने आजही समान हक्क मिळतो का? — प्रा. गुणाजी पांडुरंग नलगे | 189 |


SHIVAJI COLLEGE HINGOLI
Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

# महिलांना पुरुषाच्या बरोबरीने आजही समान हक्क मिळतो का?

प्रा. गुणाजी पांडुरंग नलगे
क्रीडा संचालक,शिवाजी महाविद्यालय, हिंगोली
मो.नं.9420038008 ई-मेल-nalgegp21@gmail.com

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

**प्रस्तावना:-** फार पूर्वीच्या काळी काही भागात महिलाप्रधान कुटुंब पद्धती होती तर काही भागात पुरुषप्रधान कुटुंब पद्धती होती. कालांतराने मध्ययुगीन कालखंडात लोकसंख्येत वाढ होत गेली तसे नऊ नवीन वस्तूंचे, हत्यारांचे शोध लागत गेले, तसे पुरुषांचे समाज जीवनावरील पारडे जड होत गेले. संघर्षाच्या कालखंडात पुरुष समाज व्यवस्थेवर हवी होत गेला. त्याला अनेक कारणे आहेत शारीरिक प्रगतीच्या दृष्टीने पुरुष महिला पेक्षा प्रबळ ठरतो, पुरुषाच्या आक्रमक वृत्ती पुढे महिलांच्या आक्रमकता सौम्य असते. प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, माया, ममता ह्या आणि इतर अनेक गोष्टी ह्या महिलात उपजत जास्त प्रमाणात असतात. त्यामुळे महिलांना आयुष्यात आपल्या जोडीदाराबरोबर समाजातील इतर व्यक्तीबरोबर वागताना अनेक संघर्ष करावे लागतात. ह्या संघर्षाचा सामना करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते या समस्या अनेक प्रकारच्या आहेत. त्या म्हणजे सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, महिलांचा ढासा चालेला जन्मदर, राजकीय वातावरण या समस्यांना सामोरे जाताना महिलांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. पुरुषांचा पगडा सध्या संपूर्ण व्यवस्थेवर महिला पेक्षा जास्त आहे. स्त्री पुरुष एकाच रथाचे दोन चाके आहेत, स्त्रीला अर्धांगिनी म्हटले जाते, स्त्रीला देवता म्हटले जाते, स्त्री- पुरुष समान आहेत असे मोठमोठाले शब्द वापरून आभासी स्त्री पुरुष समानता दाखविली जात आहे. भारतातील पुरुषच नाही तर महिलांना पण वाटते की महिलांना समान अधिकार प्राप्त झाले आहेत. बीबीसी ने भारतातील 14 राज्यात सर्वे केला त्यात त्यांना 91 % टक्के लोकांनी स्त्री पुरुष समानता आहे असे म्हटले आहे. पण सत्य परिस्थिती आणि सर्वे यात विरोधाभास दिसतो. समान अधिकार असावेत असे प्रत्येक महिलेला वाटते पण त्याचा अर्थ काय होतो याची जाणीव महिलांना आजही नाही. लग्नापूर्वी अनेक जणांना वाटते की महिलांनी घराबाहेर पडावे पण त्यांचेच त्या महिलेसोबत लग्न झाले की खूप कमी जणांना वाटते की महिलांनी घराबाहेर पडावे. यावरून लक्षात येते की कथनी और करणी मे फरक है। खरं म्हणजे स्त्रियांनी स्वतःचा निर्णय स्वतः घेतला पाहिजे दुसऱ्यावर किंवा पुरुषावर विसंबून

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)



3/2

SHIVAJI COLLEGE HINGOLI

राहू नये. आत्मविश्वासाने जगासमोर आले पाहिजे, स्त्रीला प्रजनन क्षमता ही नैसर्गिक देणगी आहे. पण याचाच फायदा पुरुष प्रधान संस्कृतीने घेऊन स्त्रीला संसारात अडकिवली आहे. त्यामध्ये स्त्री जास्त गुंतत गेली आणि त्याच मजबुरीचा फायदा घेत स्त्रीला सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बाबीपासून दूर ठेवले. जसे बेडकाला त्याचे जग म्हणजे विहीर त्याप्रमाणे स्त्रीला घर आणि संसार म्हणजे जग यात गुंतवत ठेवले. पुरुष मात्र बाहेरील कामे करणे, फिरणे यासाठी मोकळा झाला. याचाच परिणाम स्त्री ही चूल आणि मूल या पुरती मर्यादित राहिली. पण आज बघितले तर स्वतंत्र भारतातील स्त्री हा संसार सांभाळून, उंबरठा ओलांडून पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करताना दिसते. पुरुषाप्रमाणे स्त्रीलाही त्यांचे स्वतःचे आयुष्य स्वतंत्रपणे घडवण्याचा अधिकार आहे. स्त्री-पुरुषा मधील दिसते ती विषमता निसर्गनिर्मित नसून ती मानवनिर्मित आहे. स्त्री-पुरुष समान आहेत असे ठासून सांगितले जाते. पण आजही मुलगाच जन्माला यावा असे प्रतेक स्त्रीला आणि पुरुषाला वाटते असे का? आई-वडिलावर पनती च्या स्निग्धज्योतीप्रमाणे मनापासून प्रेम करणारी, त्यांना जपणारी, सांभाळ करणारी मुलगी जन्माला आली की नाके मुरडली जातात. स्त्री शिवाय जगाचा विकास होऊच शकत नाही, ही सत्य परिस्थिती डोळ्यासमोर असताना **'लेक वाचवा'** ही मोहीम राबवावी लागते. स्त्रीभ्रूण हत्या रोखण्याकरिता कायदा करावा लागतो हे लज्जास्पद आहे. इतके करूनही मुलगा जन्माला येईपर्यंत स्त्रीभ्रूण हत्या थांबत नाहीत याला प्रगती म्हणायची का? महिला सबलीकरणासाठी तसेच स्वसंरक्षणासाठी राष्ट्रीय पातळीवर बरेच कायदे करण्यात आले पण त्यामुळे महिला वरील हल्ले कमी न होता ते वाढतच आहेत. आभाशी महिला सबलीकरण आपणास दिसत आहे. मॉलमध्ये, सिनेमागृहात, मोबाईल शॉपीवर, बाजारात, टी.व्ही जाहिरातीमध्ये दिसते पण हे वास्तविक सबलीकरण नाही. ग्रामीण भागात बघितले तर वास्तविकता काय आहे हे समोर येते. डिसेंबर 1948 रोजी संयुक्त राष्ट्र संघटने कडून घोषित करण्यात आलेल्या मानव अधिकाराच्या जाहीरनाम्याच्या पहिल्या दोन कलमांमध्ये सर्व व्यक्ती जन्मताच समान असून वंश, लिंग, भाषा, धर्म आधी वरून त्यांच्यात भेदभाव केला जाऊ नये असे स्पष्ट करण्यात आले. कलम 23 मध्ये स्त्री आणि पुरुषासाठी समान कामासाठी समान वेतनाची तरतूद करण्यात आली आहे. 1975 हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघटने कडून आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. वर्षानुवर्ष महिलांना उपेक्षित ठेवणारे आणि त्यांच्या शोषणाला जबाबदार असणारे लिंग भेदावर



Assistant Professor
Shivaji College, Hingoli,
Ta.& Dist.Hingoli.(M.S.)
314 313

आधारित विषम धोरण नष्ट करण्यासाठी युनो तर्फे महत्त्वपूर्ण ठराव 1979 साली मंजूर करण्यात आला. या कायद्यात समान राजकीय आणि आर्थिक अधिकार मिळावेत म्हणून तसेच विकासात्मक कार्यात सहभागी होता यावे यासाठी विशेष तरतूद करण्यात आली. 1985 च्या नैरोबी येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय महिला परिषदेत सर्वप्रथम महिला सक्षमीकरण /सबलीकरण या शब्दाचा उच्चार करण्यात आला. यामुळे आज महिलांच्या काही चळवळी प्रभावीपणे कार्यरत आहेत. उदाहरणार्थ- महागाई विरोधात, पर्यावरण सुरक्षा, दारूबंदी महिला आरक्षण, पर्यावरणासंबंधी 'चिपको' आंदोलन, नर्मदा बचाव आंदोलन त्याचबरोबर इंदिरा गांधी सारखे नेतृत्व हे महिला सबलीकरणाचे उदाहरण आहे. एकीकडे महिला सक्षमीकरण, सबलीकरण, समान अधिकार महिलांना दिला जात आहे असे ठणकावून सांगितले जात आहे. पण प्रत्यक्षात चित्र वेगळे आहे. स्त्री-पुरुष जन्मदरावरून लक्षात येत आहे जसजशी आपली आधुनिक तिकडे वाटचाल होऊ लागली तसतशी स्त्रियांची संख्या पुरुषांच्या प्रमाणात दिवसेंदिवस घटत चालली आहे. वरील विवेचनावरून लक्षात येते की स्त्रियांच्या मानवी अधिकारावर किती मोठ्या प्रमाणावर गदा आणली जात आहे. त्यामुळे या मानवी अधिकाराचे संरक्षण करणे, स्त्री विकासासाठी, प्रगतीसाठी प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

**निष्कर्ष:-** यावरून लक्षात येते की स्त्री ही पूर्वी ही पिडीत होती आणि आजही पीडित आहे. महिलावर होत असलेले बलात्कार, मानसिक छळ, कौटुंबिक छळ, भ्रूण हत्या हे बघून समजते की कायदे हे कागदावरच आहेत प्रत्यक्ष अंमलबजावणी नाही. खरोखरच स्त्रीला समान वागणूक द्यायची असेल तर कायद्यातील बदलाबरोबर शैक्षणिक बदल, पुरुषांच्या मानसिकतेत बदल होणे गरजेचे आहे. तेव्हा कुठे महिला स्वतंत्र जीवन जगू शकतील आणि समान हक्क मिळतील.

**संदर्भ ग्रंथ:-**

1) राज्यशास्त्र कोश - डॉ. व्होरा राजेंद्र, पळशीकर सुहास, सदाशिव पेठ, चित्रशाळा चौक, पुणे 30

2) महात्मा फुले -2012 सार्वजनिक सत्यधर्म, समाज प्रबोधन पत्रिका, पुणे

3) डॉ. श्रीमती अंजली त्रिपाठी, डॉ. अरुणोदय वाजपेयी, महिला सशक्तिकरण, 2006

4) हिंगोले, प्रा. डॉ. सौ. रेखा; महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय; इशा प्रकाशन लातूर, 2006

5) साखरे सीमा - स्त्रीवाद, सीमा प्रकाशन, 1995

Assistant Professor
Shivaji College, Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)
SHIVAJI COLLEGE



315 314

6) डॉ. शोभा दुधाटे- प्रेरणा, अरुणा प्रकाशन, लातूर, 2014

7) प्राचार्य पी.डी. देवरे- विचार मंथन, महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद, औरंगाबाद. 2014

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Assistant Professor
Shivaji College.Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)